N.C.R.B (एन.सी.आँर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर
**P.S.(ठाणे):** बंडगार्डन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0053
**Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/02/2025 06:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 06/02/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/02/2025
**Time From (वेळेपासून):** 10:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/02/2025
**Time (वेळ):** 05:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 011
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/02/2025 05:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हाधिकारी कार्यालयाचे ,मुख्य गेटसमोर समोरील ,रस्त्यावर स्कर्पिओ वाहनामध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विकास ऊर्फ अमरदीप अनंतराव मारणे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आंदगाव, ता मुळशी,जि पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आंदगाव, ता मुळशी,जि पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9356767770

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुजाता मनोहर बडदे | | | 1. फ्लट नं, 4/ए,वषाली कम्प्लेक्स,मुक्तांगण हायस्कुल शेजारी,तावरे कलनी, पुणे-9 , बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | तानाजी श्रीपती मारणे | | | 1. बी-91/24 पाण्यात टाकीजवळ, इंदिरानगर,अप्पर बिबवेवाडी , बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |



Scanned with CamScanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद दि.11/02/2025

मी श्री. विकास ऊर्फ अमरदीप अनंतरराव मारणे वय 39 वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा. आंदगाव ता. मुळशी, जि. पुणे मो.क्र. 9356767770.

समक्ष हजर राहुन जबाब देतो की, "मी वरीलप्रमाणे असुन वरील ठिकाणी कुटुंबासोबत राहण्यास आहे. माझी जमिन टेमघर धरण प्रकल्पात 2000 साली संपादन झाली असुन सदर जमिनीच्या मोबदल्यात मला शेतजमिन मंजुर झाली असुन सध्या सदर शेतजमिन आमच्या वहिवाटीस आहे. परंतु सदर शेतजमिनी सोबत आम्हास राहण्यासाठी प्रत्येकी प्रत्येक खात्यावर 0.02 आर जागा शासनाने मंजुर केली आहे. ती अदयापपर्यंत आम्हास न भेटल्याने मी व माझ्या इतर सात नातेवाईकांनी उपविभागीय अधिकारी पुणे शिरुर यांना अर्ज सादर केले आहेत. त्या अनुशंगाने त्यांनी तहसीलदार शिरुर यांना स्थळ पाहणी व पंचनामा करुन अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याप्रमाणे सदर आठ प्रकरणांचे अहवाल तहसीलदार शिरुर यांनी उपविभागीय अधिकारी पुणे शिरुर यांना सादर केले आहेत. सदर 0.02 आर भुखंड आमच्या आठ जणांचे नावे वाटप होण्याकरता व त्याकरता जलदरीतीने कारवाई करण्याकरता उपविभागीय अधिकारी पुणे शिरुर कार्यालयातील श्रीमती सुजाता बडदे-कवडे मॅडम यांनी आमच्या एकुण आठ प्रकरणांपैकी प्रत्येकी 50,000/- रुपये प्रमाणे एकुण 4,00,000/- रुपयांची माझ्याकडे दिनांक 31/01/2025 रोजी त्यांचे कार्यालयात मागणी केली आहे. माझे व सुजाता बडदे-कवडे मॅडम यांच्यासोबत कोणतेही आर्थिक व्यवहार नसुन त्यांनी मागितलेली 4,00,000/- रु. रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसुन लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली आहे. त्यांनी मागितलेली 4,00,000/- रुपये लाचरक्कम ही मला देण्याची इच्छा नाही. तरी त्यांच्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी ही नम्र विनंती ." अशी तक्रार दि. 04/02/2025 रोजी मी दिली होती.

माझ्या तक्रारीनुसार पोलीस निरीक्षक श्री. अमोल भोसले यांनी दि.06/02/2025 रोजी लोकसेवक श्रीमती सुजाता बडदे मॅडम यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन श्रीमती सुजाता बडदे मॅडम यांचेकडे पडताळणीकामी माझे सोबत व्हॉईस रेकॉर्डर देऊन शासकिय पंच श्री. राठोड यांचेसह उपविभागीय अधिकारी पुणे शिरुर कार्यालय,उपविभाग पुणे येथे पाठवले असता श्रीमती सुजाता बडदे मॅडम यांची भेट न झाल्याने सदर दिवशीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली होती.

त्यानंतर दिनांक 07/02/2025 रोजी लोकसेवक श्रीमती सुजाता बडदे मॅडम यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन श्रीमती सुजाता बडदे मॅडम यांचेकडे पडताळणीकामी माझे सोबत व्हॉईस रेकॉर्डर देऊन शासकिय पंच श्री. राठोड यांचेसह उपविभागीय अधिकारी पुणे शिरुर कार्यालय, उपविभाग पुणे येथे पाठवले असता श्रीमती सुजाता बडदे मॅडम आणि माझी भेट होवुन त्यांना मी गेल्या शुक्रवारी



Scanned with CamScanner

त्यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्या मला "तुला सांगितलं ना दादा मी" असे म्हणाल्या त्यावर मी त्यांना "त्या दिवशी तुम्ही मला पन्नास हजार रुपये सांगितले होते" असे बोललो असता त्या "बघते मी झालं की तुला सांगते" असे बोलुन मिटींगला निघुन गेल्या. त्यामुळे मी परत लाप्रवि कार्यालयात परत आलो. आमचेत संपुर्ण बोलणे न झालेने मला पुन्हा व्हाईस रेकॉर्डरसह पंच क्र.1 यांचेसोबत बडदे मॅडम यांना भेटण्याकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालय पुणे शिरुर येथे पाठविले असता बडदे मॅडम व माझी भेट झाली त्यावेळी आमचेत माझे कामासंदर्भात चर्चा झाली त्यादरम्यान श्रीमती बडदे मॅडम मला, "तुला काय दयायचयना" असे बोलल्या त्यावर मी त्यांना "आं..." असे विचारले असता त्या मला "तुला जे दयायचय ना ते तानाजीकडं दयायच... अस नाय" असे म्हणाल्या त्यावर मी बडदे मॅडम यांना "त्यानी मला 80,000/-रुपये सांगितल्यात तानाजीनं एका प्रकरणाचे" असे म्हणालो पुन्हा चर्चेदरम्यान बडदे मॅडम मला "बर तु सांग पटपट.. तु सांग" असे म्हणाल्या त्यावर मी बडदे मॅडम यांना "एका प्रकरणाचे 40,000/- रुपये देतो" असे म्हणालो असता त्यांनी "कर.... कर....फक्त देताना तानाजी थ्रु दयायचे" असे बोलुन माझे व इतर 7 प्रकरणांचे प्रत्येकी 40,000/- रुपये प्रमाणे एकुण 3,20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न होवून सदरची लाच रक्कम श्री. तानाजी मारणे (खाजगी इसम) याचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मी लाप्रवि कार्यालय येथे परत आलो. लोकसेवक श्रीमती बडदे मॅडम यांनी लाचेची रक्कम तानाजी मारणे यांचेकडे देण्यास सांगितल्याने मी तानाजी मारणे यांना माझे मोबाईल क्रमांक 9356767770 यावरुन तानाजी मारणे याचे मोबाईल क्रमांक 9763709495 यावर फोन करुन फोनचा स्पीकर ऑन करुन, "मॅडमनी मला म्हटले... तानाजी मारणे ना सांग.... बडदे मॅडम म्हणल्या की, चाळीस हजारांनी ठरलय म्हणुन एक प्रकरण...आणि ते पैसे तुमच्याकडं दयायला सांगितलेत" असे तानाजी मारणे यांना सांगितले असता त्यावर ते मला "बरं ठीकयं... दे मंग... तुझी झाली तयारी तर ये घेवुन देवुन टाकतो... तुझ्या समोरच देतो." असे बोलले त्यावर मी त्यांना "कधी" अशी विचारणा केली असता त्यांनी मला सोमवार दिनांक 10/02/2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात दुपारनंतर लाचेची रक्कम जमेल तेवढी घेवुन येण्यास सांगितले. त्यामुळे दिनांक 07/02/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करुन पुढील सापळा कारवाई दिनांक 10/02/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.

त्याप्रमाणे दिनांक 10/02/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरवून पो नि भोसले यांनी दोन पंचासमक्ष मला खाजगी इसम तानाजी मारणे यांना एकुण रु.3,20,000/- पैकी किती लाच रक्कम देणार आहे अशी विचारणा करता मी आमचे एकुण 08 प्रकरणांपैकी 04 प्रकरणांचे प्रत्येकी रु.40,000/- प्रमाणे एकुण रुपये 1,60,000/- देणार आहे परंतु माझेकडे माझ्या बचतीमधील रु.40,000/- जमा झाल्याचे मी पोनि अमोल भोसले यांना सांगितले. त्यामुळे मी हजर केलेली रक्कम रु.40,000/- व त्यामध्ये पोनि भोसले यांचे कार्यालयातील चिल्ड्रेन बँक ऑफ इंडिया रु.500/- असे लिहलेल्या डमी 220 नोटा असे एकुण रु.1,60,000/- लाच रक्कम खाजगी इसम तानाजी मारणे यांना देण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार पोनि भोसले यांनी दोन्ही पंच व मला अँथ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले व मी हजर केलेल्या 500/- रु. दराच्या भारतीय चलनातील 80 ख-या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन त्या नोटांना आणि डमी 220 नोटांना अँन्थ्रॉसिन पावडर लाऊन त्या माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशामध्ये ठेवल्या. सदरची लाचरक्कम खाजगी इसम तानाजी मारणे यांना देणेकरीता मला व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच नं 1 यांचेसोबत जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि भोसले व उर्वरीत सापळा पथक रवाना झाले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोर्चा असल्याने आम्ही शासकीय कोषागार इमारत परिसरामध्ये एसबीआय बँक, ट्रेझरी शाखेच्या समोर थांबुन मी तानाजी मारणे यांना फोन करुन सदर ठिकाणी आल्याचे सांगितले. पुढील थोडयाच वेळात तानाजी मारणे माझ्याजवळ आले त्यावेळी मी त्यांना चार प्रकरणांची रु.1,60,000/- रक्कम सोबत आणल्याचे सांगितले असता तानाजी मारणे यांनी चार जणांच्या नावाची चिठ्ठी आणलीय का? असे मला विचारले असता मी माझे स्वहस्तक्षरात माझे व इतर तीन जणांची नावे लिहलेला ए4 साईजचा कागद त्यांना दिला, त्यानंतर सोबत आणलेल्या लाचरक्कमेबाबत विचारले असता त्यांनी लाच रक्कम हातात घेण्यास नकार देवुन सदरची लाच रक्कम ही त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्य गेटसमोर आंबेडकर चौकाचे दिशेने पार्क असलेल्या स्कॉर्पिओ वाहनामध्ये आणुन देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्य गेटसमोर आंबेडकर चौकाचे दिशेने पार्क असलेल्या स्कॉर्पिओ वाहनाजवळ गेलो असता ड्रायव्हर सिटवर तानाजी मारणे बसले होते त्यावेळी आमचेत झालेल्या चर्चेदरम्यान मी तानाजी मारणे यांना "देवु का" असे बोललो असता, त्यांनी मला "हंम्म दे..." असे बोलले असता मी माझ्या पॅन्टचे पुढील उजव्या खिशामध्ये अँन्थ्रासीन पावडर लावलेली लाचरक्कम उजव्या हाताने बाहेर काढुन ती तानाजी मारणे यांचेसमोर धरली असता ती त्यांनी त्यांचे उजव्या हाताने स्वीकारुन स्कॉर्पिओचे पुढील डाव्या बाजुस ग्लोव्ह



Scanned with CamScanner

बॉक्समध्ये ठेवली व मला "कितीयेत" असे विचारले असता मी त्यांना "एक साठ..." असे सांगितले. त्यानंतर मी लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केल्यानंतर पो. नि. भोसले व सापळा पथक असे त्या ठिकाणी येऊन तानाजी मारणे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर सदर स्कॉर्पिओ वाहनामध्ये कुत्रिम अंधार करून पंचासमक्ष तानाजी मारणे यांचे उजव्या हाताचे पंज्यावर अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाश टाकला असता तानाजी मारणे यांच्या उजव्या हाताचा पंजा व बोटांच्या पे-यावर अँथ्रासिन पावडरची निळया रंगाची चकाकी दिसुन आली. त्यावेळी खाजगी इसम तानाजी मारणे यांनी माझी यात काहीही चुक नसून सदरची लाच रक्कम मी माझे करीता न स्वीकारता लोकसेवक बडदे मॅडम यांचेकरीता स्वीकारली असून मी त्यांना फोन लावून तुमची खात्री करून देतो असे पोनि भोसले यांना सांगितले. त्यावेळी पोनि भोसले यांनी व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तानाजी मारणे यांचे समोर धरला असता त्यांनी त्यांचेकडील मोबा.क्र.9763709495 वरून लोकसेवक श्रीमती बडदे यांचा मोबा.क्र. 9767640591 वर फोन करून फोनचा स्पीकर ऑन केला असता श्रीमती बडदे यांनी फोन उचलला असता खाजगी इसम मारणे यांनी "ते त्यांनी दिलं बरंका मॅडम ते, चार हयाचं दिल्यांत, हा त्यांनी एक, एक साठ दिल्यात " असे बोलून श्रीमती बडदे यांना माहिती दिली असता त्यावर श्रीमती बडदे यांनी "हा ठीकय" असे बोलून सहमती दर्शविली.

तरी दिनांक 06/02/2025 रोजी 10.30 वा. ते दिनांक 10/02/2025 16/15 वा. चे दरम्यान श्रीमती सुजाता मनोहर बडदे, वय-50 वर्षे, पद- अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी पुणे शहर-शिरुर, उपविभाग पुणे रा. फ्लॅट नं, 4/ए, वृषाली कॉम्प्लेक्स, मुक्तांगण हायस्कुल शेजारी, तावरे कॉलनी, पुणे-9 यांनी माझी जमिन टेमघर धरणात संपादित झाल्याने मला मौजे विठ्ठलवाडी ता. शिरुर जि. पुणे येथे 0.02 आर क्षेत्राचा भुखंड शासनाकडुन वाटप होणेकरीताचे प्रकरणामध्ये जलदगतीने कारवाई करण्याकरीता माझे व माझे इतर सात नातेवाईकांचे प्रकरणांसाठी प्रत्येकी 40,000/- रुपये याप्रमाणे एकुण रुपये 3,20,000/- ची लाचेची मागणी करुन त्यापैकी चार प्रकरणांचे रु.1,60,000/- लाच रक्कम खाजगी इसम श्री. तानाजी श्रीपती मारणे,वय 46 वर्षे, व्यवसाय- शेती, रा.बी-91/24 पाण्यात टाकीजवळ, इंदिरानगर, अप्पर बिबवेवाडी मुळ रा.विठ्ठलवाडी पुनर्वसन गावठान ता.शिरुर जि.पुणे यांचेमार्फतीने जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्य गेटसमोर समोरील रस्त्यावर स्कॉर्पिओ वाहनामध्ये स्वीकारली. तसेच खाजगी इसम श्री. तानाजी मारणे यांनी लोकसेवक श्रीमती बडदे मॅडम यांनी माझ्याकडे केलेल्या लाचमागणीस प्रोत्साहन देवुन मदत केली म्हणुन माझी त्यांचेविरुदध फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA MANOHAR GAIKWAD(I (Inspector)) / PQRN72854

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

एस. एच. ओ./ठाणे अंमलदार
[illegible] पोलीस स्टेशन, पुणे शहर.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA MANOHA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN72854



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner